# तुटवड्यामुळे शिलकी कापूस गाठींचा वापर वाढला



- जगभरातील ४० टक्के गाठींचे व्यवहार
- चीनचा संरक्षित साठा फक्त २० टक्क्यांवर
- पुढचा हंगामही तेजीत राहण्याचे संकेत

**चंद्रकांत जाधव**

जळगाव : जगात दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक व मोठा निर्यातदार म्हणून ओळख असलेल्या भारतातील महाराष्ट्रासह काही दाक्षिणात्य राज्यांमध्ये बोंड अळीने कापसावर हल्ला केल्याने त्याचे जगभरातील कापूस व्यवसायावर प्रतिकूल परिणाम झाले आहेत. अळीग्रस्त पिवळसर रुईची मागणी नसल्याने जगात दर्जेदार रुईची (८० टक्के शुभ्र) गरज भागविण्यासाठी चीन वगळता इतर सर्व राष्ट्रांनी आपल्या मागील कापूस हंगामातील गाठींची (कॅरी फॉरवर्ड) आंतरराष्ट्रीय बाजारात विक्री सुरू केली आहे. यातच चीननेही आपली स्थानिक गरज पूर्ण करण्यासाठी संरक्षित साठ्यातून (बफर स्टॉक) गाठींचा (एक गाठ १७० किलो रुई) पुरवठा केल्याची माहिती कापूस बाजारपेठ विश्लेषकांनी दिली आहे.

चीन जगातील सर्वांत मोठा कापूस उत्पादक देश आहे. ५०० लाख गाठींचे उत्पादन चीन करतो. परंतु चीनमध्ये कापसाचे क्षेत्र २० टक्क्यांनी घटले आहे. यातच चीनने २०१४ पासून ४ कोटी गाठींचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) करून ठेवला होता. कापसाची आयात न करता संरक्षित साठ्याचा उपयोग स्थानिक गरजेसंबंधी चीनने सुरूच ठेवला आहे. दुसऱ्या बाजूला उत्पादन कमी झाल्याने चीनचा संरक्षित साठा एक कोटी गाठींपर्यंत राहिला असून, पुढील काळात चीनदेखील स्थानिक गरजेसंबंधी आशियाई किंवा आपल्याला सोयीस्कर असलेल्या देशांमधून कापसाची आयात करील. त्यामुळे बाजारातील तेजी टिकून राहील, असे संकेत आंतरराष्ट्रीय बाजारात असल्याची माहिती बाजारपेठेचे अभ्यासक संदीप पाटील (जळगाव) यांनी दिली.

**कॅरी फॉरवर्डचे प्रमाण घटले**

रुईचा किंवा गाठींचा हंगाम ३० सप्टेंबरपर्यंत असतो. १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर, असा रुईचा हंगाम असतो. ३० सप्टेंबरनंतर ज्या गाठी जगात शिल्लक राहतात त्यांना कॅरी फॉरवर्ड म्हटले जाते. जगात (चीन वगळता) कॅरी फॉरवर्ड गाठी सुमारे दीड कोटी होत्या. त्यात भारतातील ३५ लाख गाठींचा समावेश आहे. यातच यंदा भारतात प्रमुख कापूस उत्पादक असलेल्या महाराष्ट्र व काही दाक्षिणात्य राज्यांमध्ये गुलाबी बोंड अळीचा कापसावर प्रादुर्भाव दिवाळीलाच झाला. जगात ८० टक्के शुभ्र असलेल्या रुईचा उठाव असत, परंतु अशी रुई मिळणे किडक्या बोंडांमुळे दुरापास्त झाले. अशातच डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून रुईचे दर वाढले. बाजारातील तेजी कॅश करण्यासाठी मागील हंगामातील शिल्लक रुईचा वापर वाढला. परंतु यामुळे कॅरी फॉरवर्ड गाठींचा जगभरातील कापूस निर्यातदार देशांमध्ये वापर वाढला असून, परिणामी कॅरी फॉरवर्ड गाठींमधील ४० टक्के वापर आजघडीला झाला आहे. दीड कोटी गाठींमधून ८० ते ९० लाख गाठी शिल्लक असतील, असे सांगण्यात आले.

**डॉलर कमकुवत, निर्यातीवर परिणाम शक्य**

सध्या रुपया डॉलरच्या तुलनेत मजबूत होत आहे. ६३.२२ पैसे ते ६३.४९ पैसे असे डॉलरचे मूल्य आहे. यामुळे भारतातील कापूस निर्यातीवर परिणाम शक्य आहे. परंतु असे असले तरी स्थानिक सूतगिरण्यांमध्ये सुताची तीन ते साडेतीन टक्के मागणी वाढली आहे. स्थानिक गरज भागविण्यासाठी देशात पावणेतीनशे लाख गाठींची गरज असेल. त्यात पुढे संरक्षित साठाही ४० ते ४२ लाख गाठींचा करावा लागेल. यंदा देशात गाठींचे उत्पादन घटणार असून, ३१५ लाख गाठींचे उत्पादन शक्य आहे. गाठींचे दर टिकून राहतील, असे महाराष्ट्र सहकारी सूतगिरणी कार्यकारी संचालक असोसिएशनचे सदस्य राजाराम पाटील (शहादा, जि. नंदुरबार) 'अॅग्रोवन'शी बोलताना म्हणाले.

# उपनिबंधकांनी सावकारी प्रकरणे अन्य अधिकाऱ्यांकडे वर्ग केल्याचा आरोप

## सावकारग्रस्त समितीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**नागपूर (प्रतिनिधी) :** न्याय मागण्यांसाठी केलेल्या उपोषणाचा रोष मनात धरत अकोला जिल्हा सहकारी संस्थेच्या उपनिबंधकांनी सावकारी प्रकरणे अन्य अधिकाऱ्यांकडे वर्ग केल्याचा आरोप सावकारग्रस्त शेतकरी समितीने केला आहे.

सावकारग्रस्त शेतकरी समितीने या संदर्भाने मुख्यमंत्री, सहकारमंत्री, विरोधी पक्षनेता राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन सादर केले आहे. त्यानुसार, राज्यात महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ लागू करण्यात आला. या कायद्याचा आधार घेत अकोला जिल्ह्यातील सावकारग्रस्त शेतकऱ्यांनी सावकारी प्रकरणे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांच्याकडे दाखल केली. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांनी उच्च न्यायालय नागपूर यांच्या समोरील रिट याचिका क्रमांक ५९९/२००६ याचा संदर्भ देत प्रकरणे खारीज केले. त्यावर समितीने उच्च न्यायालयाच्या ज्या निर्णयामुळे शासनाला सावकारी कायदा राज्यात लागू करावा लागला, त्याच निर्णयाचा संदर्भ देऊन सावकारी प्रकरणे खारीज केली, याची शासन दरबारी दाद मागितली. समितीने या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी २३ ऑगस्ट २०१७ रोजी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले. त्याचा राग मनात धरत जिल्हा उपनिबधंक सहकारी संस्था अकोला यांनी आकसबुद्धीने प्रकरणे अन्य अधिकाऱ्यांकडे वर्ग केली, असा आरोप आहे.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांनी समितीचे प्रदेशाध्यक्ष अरुण इंगळे यांच्या समवेत त्यांच्या दालनात असभ्य वर्तणूक केल्याचादेखील आरोप असून, या प्रकरणीदेखील शासनाकडे तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी सरकारने दखल घेत सावकारग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी समितीची मागणी आहे. समितीचे अकोला अध्यक्ष फुलचंद पाटील, बुलडाणा अध्यक्ष विशाल बावस्कर, प्रदेश उपाध्यक्ष विनोद गहेरवार यांनी हे निवेदन दिले आहे.

केवळ सर्व प्रकारच्या
मूळव्याधी
वर
JOLLY
वासीर
जेल आणि कॅप्सूल्स





जीएमपी प्रमाणित
शुद्ध आयुर्वेदिक
पहिल्या दिवसापासून परिणाम
काहीही दुष्परिणाम नाहीत
सर्व प्रमुख मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध। Helpline: 78143-66633

होय..! आम्ही देतो, कमीत कमी
एकरी ६ टन जादा ऊस उत्पादनवाढीची हमी.



वेदांत 'अॅग्रोसिल'
(नैसर्गिक सिलिकॉन ८०%)




टीप : राहुरी कृषि विद्यापीठातील प्रयोगानुसार वेदांत अॅग्रोसिलच्या वापराने ऊसाचे उत्पादन हेक्टरी १५ टन तर साखरेचे उत्पादन २.६१ टनांनी वाढले.
- साखर उतारा ०.५ % नी वाढला.
- वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट पुणे तसेच महाराष्ट्रातील सर्वच कृषी विद्यापीठांनी ऊसासाठी प्रती एकरी १६० किलो सिलीकॉन वापरण्याची शिफारस केलेली आहे.
Pingle Pub.
प्रमाण: एकरी १६० किलो वेदांत अॅग्रोसिल जमिनीतून देणे.
वेदांत अॅग्रोटेक, पुणे 9923377103 / 9960502189 9822182575 / 9527714444

सकाळ अॅग्रोवन www.agrowon.com मित्र ग्लोबल शिवाराचा..
आयोजित

महाधन एक अतूट नातं!
प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

## 'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

### कार्यक्रम वेळापत्रक

### मंगळवार, ९ जानेवारी २०१८

**विषय – कापूस पिकावरील गुलाबी बोंड आळी नियंत्रण व भुईमूग लागवड तंत्र**
**वक्ते – श्री. जीवन कतोरे** (किटकशास्त्रज्ञ, पी. के.व्ही, अकोला)
**श्री. निशांत मानके** (कृषीतज्ज्ञ, मु.पो. अकोला)
**स्थळ – ग्रामपंचायत सचिवालय, मंगरूळपीर रोड, महान, ता. बार्शीटाकळी, जि. अकोला,**
**वेळ – सायं ५.३० वा.**

### बुधवार, १० जानेवारी २०१८

**विषय – रब्बी पिकांचे किड व व्यवस्थापन**
**वक्ते – डॉ. सुरेश नेमाडे**
(केंद्रप्रमुख तथा शास्त्रज्ञ, केव्हीके, यवतमाळ)
**श्री. पी. एम.देशमुख**
(जिल्हा व्यवस्थापक, महाबीज, यवतमाळ)
**स्थळ – बाबासाहेब आंबेडकर सभागृह, फुलसावंगी, ता. महागाव , जि. यवतमाळ, वेळ – सायं ४.०० वा.**

**विषय – रब्बी पीक व्यवस्थान**
**वक्ते – श्री. अनंत पोटे**
(जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली)
**स्थळ – श्री. संजय सूर्यवंशी**
(कृषी विकास अधिकारी, जि. प. गडचिरोली)
**श्री. प्रकाश पवार**
(प्रकल्प संचालक, आत्मा गडचिरोली)
**स्थळ – कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह, चामोर्शी ता. चामोर्शी, जि. गडचिरोली, वेळ – सकाळी ११ वा.**

**विषय – रब्बी पीक किड व्यवस्थापन**
**वक्ते – श्री.नरेंद्र नाईक** (आत्मा , पी.डी. बुलडाणा)
**श्री. ए. पी. सुरळकर** (कृषीतज्ज्ञ, चिखली)
**स्थळ – महालक्ष्मी मंदिर संस्थान, मु.पो. पेठ, ता. चिखली जि. बुलडाणा, वेळ – दुपारी ४ वा.**

**विषय – संत्रा अंबिया बिहार व्यवस्थापन**
**वक्ते – श्री. प्रविण बेलखेड**
(प्रगतशील शेतकरी)
**स्थळ – महेश्वर मंदिर भवन, हिवरखेड, ता.मोर्शी, जि. अमरावती**
**वेळ – सायं. ६ वा.**

**विषय – रब्बीतील प्रमुख पिकाचे किड व्यवस्थापन**
**वक्ते – श्री. आर.एस. डवरे**
(किटकशास्त्रज्ञ, केव्हीके, करडा)
**श्री. संतोष वाळके**
(तालुका कृषी अधिकारी, मु. पो. वसारी, वाशिम)
**स्थळ – महादेव मंदिर संस्थान, मु. पो. वसारी, ता. मालेगाव, जि. वाशिम**
**वेळ – सायं. ५.३० वाजता**

**विषय : रब्बी पीक व कीड व्यवस्थापन**
**वक्ते : डॉ. प्रदीप दवने,** (कीटकशास्त्रज्ञ)
**स्थळ : सांस्कृतिक भवन, भिष्णुर, ता. नरखेड. जि. नागपूर**
**वेळ : सकाळी ९ वा.**

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**